# मुंबईविद्यापीठ

संचालक, परीक्षा व
मुल्यमापन मंडळ, मुंबई
विद्यापीठ,
मुंबई ४०००९८

(MU Exam Mission –2021)

## परिपत्रक

DBoEE/ICC/2021-22/11

मुंबई विद्यापीठाशी सलंग्नित, संचालित सर्व महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था आणि विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागात शिक्षण घेत असलेले सर्व विद्यार्थी तसेच विद्यापीठाचे माजी विद्यार्थी यांना या परिपत्राकाद्वारे कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठाच्या परीक्षेत्रात झालेल्या अतिवृष्टिमुळे आणि उद्धवलेल्या पूरपरिस्थितीमुळे काही विद्यार्थ्यांचे गुणपत्रके आणि पदवी प्रमाणपत्रे गहाळ झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणपत्रिका आणि पदवी प्रमाणपत्राच्या दुय्यम प्रती विद्यापीठाकडून निशुल्क पुरविण्यात येतील. पुढे असेही नमूद करण्यात येते की गुणपत्रिका आणि पदवी प्रमाणपत्रांच्या दुय्यम प्रती विद्यार्थ्यांच्या संबंधित महाविद्यालयात पाठविण्यात येतील. यासाठी विद्यार्थ्यांनी शासकीय पंचनाम्याच्या प्रतीसह खालील माहिती certificate_help@exam.mu.ac.in या ई-मेल आयडीवर विद्यापीठाकडे सादर करावी.

| | |
|---|---|
| विद्यार्थ्याचे नाव | |
| अभ्यासक्रमाचे नाव ( उदा. बीए. बीएस्सी, बीकॉम) | |
| परीक्षेचे वर्ष (उदा. एप्रिल २०१९, ऑक्टोबर २०१९ | |
| सत्र (उदा. सत्र-१, सत्र-२,सत्र-३...) | |
| आसन क्रमांक (असल्यास) | |
| गुणपत्रक हवे असल्यास पुढील रकान्यात टीक करावे | |
| पदवी प्रमाणपत्र हवे असल्यास पुढील रकान्यात टीक करावे | |

ठिकाण : मुंबई-४०००३२
दिनांक : ०३/०८/२०२१

(डॉ. विनोद पाटील)
संचालक
परिक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रत :
मुंबई विद्यापीठाशी संलग्नित/संचलित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक, विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख व विद्यापीठाच्या उपपरिसरांचे समन्वयक/संचालक.

**प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**
१) उपकुलसचिव, गुण व प्रमाणपत्र कक्ष, परिक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी परिसर, मुंबई ४०००९८
२) उपकुलसचिव, माहिती व जनसंपर्क विभाग, फोर्ट परिसर, मुंबई विद्यापीठ, मुंबई ४०००३
३) स्वीय सहाय्यक : १) कुलगुरु २) प्र—कुलगुरु ३) कुलसचिव